# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

**दिनांक : ०३/०७/२०२३**

### प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

मा.मुख्यमंत्री महोदय यांनी राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रात जेष्ठ नागरीकांकरीता विरंगुळा केंद्र उभारणेच्या सुचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने उल्हासनगर-३ भाजी मार्केट जवळील इंदीरा गांधी उद्यान येथेउल्हासनगर महापालिकेमार्फत ज्येष्ठ नागरीकांकरीता विरंगुळा केंद्र सुरु करण्यात आले. दिनांक ०३/०७/२०२३ रोजी सदर विरंगुळा केंद्राचे मा.आयुक्त श्री.अजित शेख यांचे मार्गदर्शनाखाली मा.अतिरिक्त आयुक्त डॉ. करुणा जुईकर यांचे हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

ज्येष्ठ नागरिकांसाठी अधिकाधिक केंद्रे शहरात टप्प्या-टप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत. पहिल्यांदाच अशाप्रकारे शहरातील ज्येष्ठांसाठी चांगला उपक्रम होत असल्याने ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमाबद्दल उत्सुकता व्यक्त केली.पालिका क्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या व 60 वर्षावरील वयोगटातील नागरिकांना विरंगुळा मिळावा व त्यातून त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य विषयक हित जपले जावे यासाठी हे विरंगुळा केंद्र असणार आहे. ज्येष्ठ नागरिकांची मोठी संख्या पाहताअशा प्रकारच्या केंद्रांची मागणी होती.

सदर विरंगुळा केंद्रामध्ये नागरीकांना बसण्याकरीता हॉल , विविध वृत्तपत्रे, कॅरम, बुद्धीबळसारखे बैठे खेळ असणार आहे. वृद्धांची सोय व्हावी म्हणून वजन मोजणी यंत्र, वाफ घेण्याचे इलेक्ट्रिक भांडे तसेच शेकण्याची इलेक्ट्रीक बॅग तिथे उपलब्ध करून ज्येष्ठांची दररोजची चर्चा, त्यांचे विविध कार्यक्रम होऊ शकतील. सदर विरंगुळा केंद्र सुरू ठेवण्याची वेळ सकाळी 7 ते 10 व सायंकाळी 5 ते रात्री 9 वाजेपर्यंत असणार आहे. या विरंगुळा केंद्रात ज्येष्ठांच्या मनोरंजनासाठी तसेच आरोग्य विषयक कार्यक्रमांचे आयोजन करता येणार असून ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सुखमय व्हावे म्हणून पालिकेच्या माध्यमातून हा प्रयत्न होत आहे.

**या कार्यक्रमाचे वेळी खालील मान्यवर उपस्थित होते.**

१) मा. डॉ. करुणा जुईकर , अतिरिक्त आयुक्त (सेवा )

२) श्री. संदीप जाधव, प्र.शहर अभियंता

३) श्रीम. छाया जावळे, जनसंपर्क अधिकारी

४) श्रीम. दिप्ती पवार, उद्यान अधिक्षक

Dangale 3/7/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत —माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.